रयत शिक्षण संस्थेचे,

## अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स व

## हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज, मंचर जि.पुणे

## नोटीस

## आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य शिष्यवृत्ती

दि.२५/०१/२०२२

महाविद्यायातील सिनिअर व पी.जी विभागातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींना कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठाकडील परिपत्रक पत्र क्र. शै.प्रवेश २२३ दि. १९/०१/२०२२ नुसार **आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गातील गरीब, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य** योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरिता ज्या विद्यार्थ्यांना अर्ज करावयाचे असतील त्यांनी **दि. ११/०२/२०२२** रोजी पर्यंत अर्ज **(0nline)** पद्धतीने भरुन महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागात जमा करावेत. अर्जाची वेब साईट **http://bcud.unipune.ac.in/Scholarships/Appllicant/Login.aspx** या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक असून आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत **Upload** करावीत. सोबत अर्ज करण्याची माहिती खालीलप्रमाणे

**अर्थसहाय्य योजनेकरिता पात्रता खालील प्रमाणे राहील.**

१) उत्पन्नाची मर्यादा २,५०,०००/— पेक्षा जास्त नसावी.

२) सन २०२०—२१ चा तहसिलदाराने दिलेला उत्पन्नाचा दाखला.

३) विद्यार्थ्यांचे मागील वर्षाचे अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.

४) ६५% च्या पुढे गुण असणाऱ्या विद्यार्थीच अर्ज करता येईल.

५) विद्यार्थ्यांने त्याच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅंकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, आयएफएससी कोड.

६) विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. रहिवासी दाखलयाची (Domicile Certificate) True copy साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

**अर्जासोबत खालील गोष्टींची पूर्तता करावी.**

१. अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्यांचे एकूण उत्पन्न (उत्पन्नाचा दाखला)

२. मागील परीक्षेचे मार्कलिस्ट (गुणपत्रक) झेरॉक्स

३. अर्जदाराच्या कुटुंबात अवलंबून असणाऱ्या व्यक्तींची संख्या

४. आईवडील किंवा पालक यांची सही

टीप:— ज्या विद्यार्थीनींना इतर कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती मिळत नाही अशा विद्यार्थीनींचा प्राध्यान्याने विचार करण्यात येईल नोंद घ्यावी.

प्राचार्य
अण्णासाहेब आवटे कॉलेज,
मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे